## निशाण क्र. १०३ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३६ यांचे नाव कमी करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेबाबत दिलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. ३६ भिकाजी तुळा तांबे हे दि. २३/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांची वारस पत्नी याकामी प्रतिवादी क्र. ५ हिरावती भिकाजी तांबे या दाव्याचे कामी पक्षकार आहे. सबब, प्रतिवादी क्र. ३६ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून हरकत घेतली आहे. अर्ज खोटा असून तो नामंजूर करण्यात यावा असे सांगितले आहे.

३. प्रतिवादी क्र. ३६ यांना प्रतिवादी क्र. ५ हे वारस असलेचे वादी यांनी पटलावर आणलेले आहे. त्यांचे व्यतिरीक्त इतर कोणी वारस असल्याचे वादी यांनी पटलावर आणलेले नाही. सबब अर्ज मंजूर करण्यात येत आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आजपासून चौदा दिवसांचे आत दाव्यात दुरुस्ती करुन तशी दुरुस्ती प्रत याकामी हजर करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ: देवगड ( बी. आर. पाटील )

दिनांकः ०१/१२/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2021.12.02 15:05:39 +0530